(3)

(429)

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी ४०० १८
कामगार कल्याण विभाग
क्र.काक/३/४१२/२०१२
दिनांक:-२२/८/२०१२

विषयः- इमारत व इतर बांधकाम कामगार (रोजगार व सेवाशर्ती ) अधिनियम १९९६ व इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याण उपकर नियम १९९८ अंतर्गत १ % उपकर वसुलीबाबत...

संदर्भः- १) इमारत व इतर बांधकाम कामगार (रोजगार व सेवाशर्ती नियमन) अधिनियम १९९६
२) इमारत व इतर बांधकाम कामगार उपकर अधिनियम १९९६
३) इमारत व इतर बांधकाम कामगार उपकर नियम १९९८
४) महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार (रोजगार व सेवाशर्ती नियमन) नियम २००७ दि.५/२/२००७
५) शासन परिपत्र क्र बीसीए १२००७/प्र.क्र ७८८/ कामगार ७ दिनांक २१/०४/२००८
६) शासन निर्णय क्र. बीसीए २००९/प्र.क्र-१०८/कामगार ७-अ दिनांक १७ जून २०१०

परिपत्रक,

इमारत व इतर बांधकाम कामगार यांचे संदर्भात रोजगार व सेवाशर्ती तसेच त्यांची सुरक्षा, आरोग्य कल्याण विषयक व इतर संबंधित बाबीसाठी तरतुदी करण्याच्या उद्देशाने करण्यात आलेल्या इमारत व इतर बांधकाम (रोजगार व सेवाशर्ती नियमन) अधिनियम १९९६ या केंद्रिय अधिनियमातील तरतुदीच्या अनुषंगाने महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र व इतर बांधकाम कामगार कल्याण उपकर नियम २००७ तयार केले आहेत. याच अधिनियमानुसार प्रदान करण्यात आलेल्या अधिकाराचा वापर करुन शासनाने महाराष्ट्र राज्य इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाची स्थापना केली आहे.

शासन परिपत्रकान्वये इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याण उपकर अधिनियमानुसार बांधकाम खर्चाच्या १ % उपकर महाराष्ट्र राज्य इमारत व इतर बांधकाम कल्याण उपकर मंडळास निधीसाठी इमारत व इतर बांधकाम नियोक्त्याकडून दि.१ जानेवारी २००८ पासून पूर्व लक्षी प्रभावाने वसुली करणे आहे.

## इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याण उपकर अधिनियम १९९६ मधील व्याख्या :-

१. इमारत व इतर बांधकाम :

अधिनियमातील कलम २ (डी) नुसार इमारत व इतर बांधकाम म्हणजे बांधकाम, फेरफार, दुरुस्ती, देखभाल किंवा पाडून टाकणे इत्यादी इमारत, रस्ते, मार्ग, रेल्वे, ट्रामवेज, एअर फिल्ड्स, पाठबंधारे, जलःनिसारण,बंधारा व नेव्हीगेशन काम, पुर नियंत्रणाचे काम (वादळामुळे जलनिस्सारणाच्या कामासहीत) तेल व वायुची जोडणी टाकणे, विद्युत लाईन्य, वायरलेस, रेडीओ, टेलिव्हीजन, टेलिफोन, टेलिग्राफ आणि समुद्रापार दळणवळण, धरणे,

कालवे, जलाशये, जलप्रवाह, बोगदे, पुल, सेतु, सेतुप्रणाल, पाईपलाईन, टॉवर्स, कुलीग टॉवर्स, पारेषण टॉवर्स, आणि या प्रकारचे इतर कामे समुचित शासन अधिसुचनेद्वारे लागू करु शकते,

परंतु कारखाने अधिनियम, १९४८ किंवा खाण अधिनियम, १९५२ च्या तरतुदी ज्या आस्थापनेस लागू होतात त्यांना इमारत व इतर बांधकाम कामगार अधिनियमाच्या तरतुदी लागू होणार नाहीत.

२. मालक :

मालक ची व्याख्या कलम २ (i) मध्ये इस्टाब्लीशमेंट संबंधात नमुद केलेली आहे. त्यात खालील प्रमाणे अंतर्भाव होतो:-

१) इमारत व इतर बांधकाम काम स्थानिक संस्थांतर्फे किंवा इतर आस्थापनेमार्फत करण्यात येत असल्यास व ज्यात प्राधिकारी नेमुन दिलेला नसल्यास अशा बाबतीत विभागाचा प्रमुख

२) जेथे इमारत व बांधकामाचे काम स्थानिक प्राधिकरणामार्फत किंवा इतर आस्थापनामार्फत, थेट कंत्राटदाराशिवाय करता येते अशा बाबतीत त्या करण्यात प्राधिकरणाचा किंवा आस्थापनेचा मुख्य कार्यकारी अधिकारी. (महापालिकेच्या बाबतीत मा.आयुक्त)

३) इमारत व इतर बांधकाम कामगार कंत्राटदारामार्फत किंवा मालकामार्फत करण्यात येते अशा बाबतीत कंत्राटदार.

३. बांधकामाचा खर्च :

इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याण उपकर नियम ९८ नियम ३(१) नुसार बांधकाम खर्चामध्ये जमिनीची किंमत, व कामगार नुकसान भरपाई अधिनियम १९२३ मधील तरतुदीनुसार कोणत्याही प्रकारची भरपाई दिलेली असेल तर ती रक्कम वगळता इमारत व इतर बांधकामास होणाऱ्या सर्व खर्चांचा समावेश होतो.

४. कोणत्याही दिवशी १० किंवा त्यापेक्षा जास्त कामगार कामावर ठेवले अशा सर्व आस्थापनाना हा कायदा लागू होतो.आस्थापना म्हणजे कलम २ (जे) कोणतीही आस्थापना जी शासनाच्या नियंत्रणात आहे.कोणत्याही निगमच्या नियंत्रणाखाली आहे किंवा व्यवसाय संस्थेच्या नियंत्रणाखाली आहे आणि वैयक्तिक किंवा असोसीएशन किंवा इतर वैयक्तिक संस्थाच्या अंतर्गत जे बांधकाम कामगार नियुक्त करतात आणि ज्यात कंत्राटदारांचा समावेश होतो परंतु व्यक्तीगतरित्या जे असे कामगार त्यांचे स्वतःचे घर बांधण्याकरीता रुपये १० लाख पर्यंत पेक्षा जास्त नसेल ते त्यांना आस्थापनेची व्याख्या लागू होणार नाही.

इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याण उपकर अधिनियम १९९६ मधील ठळक तरतुदी:-

इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याण उपकर नियम १९९८ नियम क्र. ४ अन्वये उपकर वसुली भरणा करण्याची कार्यपध्दती व मुदत खालीलप्रमाणे राहील.

१) आकारणी केलेला १% उपकर नियोक्त्याने बांधकाम पुर्णत्वानंतर ३० दिवसांत किंवा उपकर निर्धारणा आदेश दिनांकापासून ३० दिवसांचे आत (यापैकी अगोदरच्या तारखेपूर्वी) उपकर वसुली अधिकाऱ्याकडे भरला पाहिजे.

२) बांधकाम प्रकल्पाची मुदत एक वर्षापेक्षा जास्त असल्यास काम सुरु झाल्यापासून एक वर्ष पुर्ण झाल्यानंतर ३० दिवसात व त्यानंतर पुढील प्रत्येक वर्षी संबंधित वर्षात होणारा बांधकाम खर्च विचारात घेवून वर्ष वा बांधकाम पुर्ण होताच विहित दराने ३० दिवसात उपकर भरला पाहिजे.

३) सरकारी, निमसरकारी, सरकारचे अंगिकृत उपक्रमाचे बांधकामाबाबत खर्चाची रक्कम विचारात घेवून विहित दराने उद्‌गमकर (TDS) पध्दतीने उपकर नियोक्त्याच्या देय रकमेतून वसुल करुन ३० दिवसात मंडळाकडे भरला पाहिजे.

४) स्थानिक स्वराज्य संस्थांनी बांधकाम परवानगी घेण्याकरिता करावयाच्या अर्जासोबत संबंधित अर्जदाराने पुर्वगणनपत्रातील बांधकाम खर्चाच्या रकमेवर कल्याण मंडळाच्या नावे विहित दराने देय उपकर रकमेचा रेखांकित धनाकर्ष सादर केला पाहिजे.

परंतु - बांधकामाची मुदत एक वर्षापेक्षा जास्त असल्यास बांधकाम सुरु झाल्याच्या दिनांकापासून एक वर्ष मुदतीत होणारा अपेक्षित खर्च विचारात घेवून अग्रिम (Advance) उपकर भरला पाहिजे.

५) अपेक्षित खर्च विचारात घेवून नियोक्ता अग्रिम उपकर भरु शकतात. बांधकामाची मुदत एक वर्षापेक्षा जास्त असल्यास नियम ५(२) अन्वये समायोजनाची कार्यवाही केली जाते.

६) भरणा केलेली अग्रिम उपकर रक्कम निर्धारण अधिकाऱ्याने अंतिम निर्धारणा आदेशात समायोजित केली पाहिजे.

वरीलप्रमाणे वसुल केलेला उपकर महाराष्ट्र राज्य इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याण मंडळाकडे खालीलप्रमाणे सुपूर्त करावयाचा आहे.

१) वरीलप्रमाणे वसुल केलेला उपकर विहित चलनाव्दारे कार्यपध्दतीनुसार ३० दिवसात कामगार कल्याण मंडळाकडे सुपूर्त केला पाहिजे.

२) वसुल केलेला उपकर ३० दिवसांचे आत मंडळाकडे सुपूर्त केला पाहिजे.

३) उपरोक्त प्रमाणे वसुल केलेला उपकर रक्कम महाराष्ट्र राज्य इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याण मंडळ खाते क्र ००४२२०११००००१५३बँक ऑफ इंडिया, मुंबई या बँकेच्या महाराष्ट्रातील कोणत्याही शाखेत विहित चलना व्दारे करावयाचा आहे.

सदर उपकर वसुल करण्याची जबाबदारी संबंधित खातेप्रमुख यांची राहिल व एकंदरीत एका महिण्यात सर्व विभागांचा वसुल करण्यात आलेला उपकर विहित मुदतीत महाराष्ट्र राज्य इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याण मंडळाकडे भरण्याची जबाबदारी मुख्य लेखापाल यांची राहिल.

अति.आयुक्त
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी ४११ ०१८

प्रत,
सर्व विभाग प्रमुख